**Dr.BabasahebAmbedkar Marathwada University,**
ChhatrapatiSambhajinagar -431 004
Maharashtra (India)
NAAC – Accredited "A"
Tele. :
Office PBX: (0240) 2403399/400
D.B.E.E. (Office) : (0240) 2403178
FAX : (0240) 2403199
WEB SITE :http://www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-mail : director.exameval@bamu.ac.in

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
छत्रपती संभाजी नगर -४३१ ००४
महाराष्ट्र (भारत)
नॅकसमितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office
Director, Board of Examinations & Evaluation
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

---

संदर्भ/प.व.मू.मं/बी.ए/२०२४-२५/

दि. २५/०९/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित कला महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४

विषय: बी. ए. अभ्यासक्रमाच्या पी-२०१३ पॅटर्न प्रथम वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विषयसमूह जूळत नसलेल्या प्रवेशप्रकियेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये कळविण्यात येते की, बी.ए. अभ्यासक्रमाच्या पी-२०१३ पॅटर्नच्या प्रथम वर्ष उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्दितिय वर्ष पी-२०२२ या पॅटर्न मध्ये प्रवेश देतांना विषयसमुह जूळत नसल्यामूळे अडचण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले होते.

तेव्हा सदरील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता विशेष बाब म्हणून बी. ए. पी-२०१३ पॅटर्नच्या प्रथम वर्ष उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्दितिय वर्ष व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ तृतीय वर्षासाठी पी-२०१३ पॅटर्ननूसार प्रवेश देण्यात येऊन पी-२०१३ च्याच अभ्यासक्रमाने परीक्षा देण्याबाबत परवानगी देण्यात आली आहे. तसेच अशा विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी हि संबंधित महाविद्यालयाची राहिल.

या संबंधी व्दितिय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ही अंतिम संधी असेल यानंतर कुठल्याही सबबीवर पी-२०१३ पॅटर्ननूसार प्रवेश देता येणार नाही तद्नंतर अशा विद्यार्थ्यांस चालू अभ्यासक्रमानूसार प्रथम वर्षास पूर्नप्रवेश घेऊन त्यानूसार परीक्षा देण्याबाबत कळविण्यात यावे.

तरी सदरील प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व संबंधित महाविद्यालयांनी सदरील विद्यार्थ्यांचे प्रवेश फॉर्म विद्यापीठात येऊन ई-सुविधा केंद्रामार्फत (MKCL) प्रवेशप्रक्रिया व परीक्षा फॉर्म भरण्याची प्रक्रिया दि. ३०-०९-२०२४ पर्यंत पूर्ण करुन घ्यावी.

करीता आपल्या माहितीस्तव.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ